**CNR:MHBU130002502019**

खटला दाखल तारीख : ०६/०२/२०१९

खटला नोंद तारीख : ०६/०२/२०१९

निकालाची तारीख : ११/०८/२०२६

कालावधी : ०७ वर्षे ०६ महिने ०५ दिवस

# चिखली येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात

**(पिठासीन अधिकारी आय. ए. वाय. ए. खान यांचेसमोर)**

**संक्षिप्त फौजदारी खटला नं. १४३/२०१९**

**निशाणी क्र.–२५**

महाराष्ट्र सरकार तर्फे,
चिखली पोलिस स्टेशन, ता. चिखली,
जिल्हा–बुलडाणा.(गु.र.नं.६८९/२०१८) .. **अभियोग पक्ष.**

**विरुध्द**

शिवशंकर पुंडलिक वाळके
वय ३६ वर्षे, धंदा– मजुरी,
रा. धोत्रा भनगोजी,
ता. चिखली, जि. बुलडाणा .. **आरोपी.**

**फिर्याद** – भारतीय दंड विधान संहिता १८६० कलम २७९, ३३७, ३३८, ३०४–अ अन्वये.

**उपस्थिती** – मो. बशीर मो. नसीर, सरकारी अभियोक्ता.
श्री. एस. ए. माने, आरोपीतर्फे वकील.

# न्या य नि र्ण य

(**घोषीत दिनांक ११/०८/२०२६**)

आरोपीला भारतीय दंड विधान संहिता १८६० (यापूढे भा. द. वि. असे संबोधण्यात येईल) चे कलम २७९, ३३७,३३८, ३०४–अ अन्वये अपराधासाठी संपरिक्षित केले.

२. **अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन की,**

दि. २८/११/२०१८ रोजी फिर्यादी शेख नासेर शेख बशीर यांचे मामा शेख मिर्झा शेख चांद व मामी हमीदा बी हे दोघे रात्री ०९.३० वाजताच्या दरम्यान चिखली येथील राऊतवाडी स्टॉप जवळील भागामध्ये फिरायला गेले होते. तेव्हा मोटार सायकल क्र. MH–28–BC–4983 क्रमांकाच्या सीडी १०० या वाहनाने भरधाव वेगाने त्याची मोटारसायकल चालवून फिर्यादीच्या मामाला मागून धडक मारली त्यामुळे ते गंभीर जखमी झाले. त्यांच्या डोक्याला, नाकाला व पायाला मार लागला. त्यांना उपचाराकरीता तुळजाई हॉस्पीटल चिखली येथे भरती करण्यात आले होते. त्यानंतर त्यांना औरंगाबाद येथील पॅसीफिक हॉस्पीटल येथे हलवण्यात आले, तेथे उपचारादरम्यान ते मयत झाले.

३. फिर्यादी यांनी आरोपीविरुध्द चिखली पोलिस स्टेशन येथे फिर्याद दिली. सदर फिर्यादीवरुन ठाणे अमंलदार यांनी आरोपीविरुध्द वरील

कलमाअन्वये गुन्ह्याची नोंद केली. फिर्यादीने अशा प्रकारे फौजदारी प्रक्रियेस सुरुवात केली.

४. सदर गुन्हयाचा पुढील तपास किरण खाडे यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. अपघातातील मोटारसायकलची कागदपत्रे प्राप्त केली. फिर्यादी व आरोपी यांची वैद्यकीय प्रमाणपत्रे प्राप्त केले. आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता ४१(१) प्रमाणे व मो. वा. कायदा कलम २०९ प्रमाणे नोटीस दिली व गुन्हयाचा तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

५. मी आरोपीविरुध्द फौ. प्र. संहिता कलम २५१ नुसार भा. द. वि. कलम २७९, ३३७, ३३८, ३०४–अ अन्वये अपराधांकरीता दोषारोप नि. १४ येथे नोंदविले. आरोपीला त्याच्या मातृभाषेत आरोपाचा तपशील वाचून व समजावून सांगितला असता आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगून खटला चालविण्याची मागणी केली.

६. आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत करणेसाठी अभियोग पक्षाने एकूण सहा साक्षीदार तपासले. घटनास्थळ पंच सलीम कालु चौधरी (सा.क्र.१) यांना नि.१५ वर, फिर्यादी शे. नासेर शे. बशीर (सा.क्र.२) यांना नि.१७ वर, साक्षीदार

शे.कलीम शे.मिर्झा (सा.क्र.३) यांना नि.२३ वर, साक्षीदार हमीदबी शे. मिर्झा (सा.क्र.४) यांना नि. २४ वर तपासले. दोषसिध्द परिस्थिती नसल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसार आरोपीचे निवेदन वगळण्यात आले. आरोपीने त्याच्याविरुध्द नकारात्मक बचाव घेतला आहे.

७. माझे विचारार्थ निघालेले मुद्दे, त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे.

| अ.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दि. २८/११/२०१८ रोजी रात्री ०९.३० वाजणेचे सुमारास राऊतवाडी स्टॉप, चिखली ता. चिखली येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल MH–28–BC–4983 ही मानवी जिवित धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत होण्याचा संभव होईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवून अपघात केला आणि त्यायोगे भा. द. वि. कलम २७९ अन्वये शिक्षापात्र अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| ०२ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन हयगयीने, निष्काळजीपणे, मानवी जीवित अथवा इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता यास धोका होईल अशा | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | प्रकारे चालविल्यामुळे अपघात करुन फिर्यादीला जखमी होण्यास कारणीभूत झाला व त्याप्रमाणे त्याने भा. द. वि. कलम ३३७ अन्वये शिक्षापात्र अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय? | |
| ०३ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन हयगयीने, निष्काळजीपणे आणि भरधाव वेगात चालवून फिर्यादीच्या हाताला, पायाल, डोक्याला जबर दुखापत पोहचवली व त्याअन्वये आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ३३८ अन्वये शिक्षापात्र अपराध केल्याचे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | नाही. |
| ०४ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन हयगयीने, निष्काळजीपणे, मानवी जीवित अथवा इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता यास धोका होईल अशा प्रकारे चालवून शेख मिर्झा शेख चॉद यांना गंभीर जखमी करुन त्याच्या मृत्युस आरोपी कारणीभूत झाला आणि त्यायोगे भा. दं. वि. कलम ३०४(अ) अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ०५ | काय आदेश ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

८. सरकारी अभियोक्ता मो. बशीर मो. नसीर व आरोपीतर्फे वकील श्री. एस. ए. माने यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षातर्फे दाखल केलेली

कागदपत्रे तपासली.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ४ साठी –**

९. मुद्दा क्र. १ ते ४ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यावरील कारणमिमांसा एकत्रीतपणे केली आहे.

१०. अभियोग पक्षाने आरोपीवरील गुन्हा सिध्द करणेसाठी सलीम कालु चौधरी (सा.क्र.१), शे. नासेर शे. बशीर (सा.क्र.२), शे. कलीम शे.मिर्झा (सा.क्र.३), हमीदबी शे. मिर्झा (सा.क्र.४) यांना तपासले. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे त्यांना सुचक प्रश्न विचारले. परंतु, त्यामध्ये अभियोगपक्षास उपयुक्त असा कसलाही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीवरील दोषारोप शाबित करण्याकरिता त्यांचा पुरावा उपयुक्त ठरत नाही. त्यामुळे सदर साक्षीदारांना फितूर घोषीत करण्यात आले.

११. येथे हे नमुद करणे विषयाबाहेर होणार नाही की, फिर्यादीने व इतर सर्व साक्षीदारांनी त्यांच्या उलट तपासामध्ये असे सांगितले आहे की, त्यांच्यामध्ये व आरोपीमध्ये सदरहु प्रकरण आपसात मिटलेले आहे. फिर्यादीची आरोपीविरुद्ध काहीही तक्रार नाही. सदरचा अपघात हा आरोपीच्या वाहनामुळे झाला असेल हे सिध्द होत नाही, असे फिर्यादीची साक्षीवरुन स्पष्ट होते.

फिर्यादीची व साक्षीदाराची साक्ष पहाता असे दिसून येते की, फिर्यादीला सदरील खटल्यात रस उरला नाही. त्यामुळे सदरील खटला प्रलंबीत ठेवणे म्हणजे वेळेचा अपव्यय ठरेल.

**१८.** सबब या सर्व बाबींचा विचार करता, आरोपीने अपघात करुन भा. द. वि. कलम २७९, ३३७, ३३८, ३०४–अ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने निःसंशयरित्या शाबीत केले नाही. सबब, **मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी** देण्यात येते.

**मुद्दा क्र. ५ बाबत –**

**१९.** मुद्दा क्र. ५ च्या निष्कर्षाच्या अनुषंगाने अभियोग पक्षाने आरोपीने भा. द. वि. कलम २७९, ३३७, ३३८, ३०४–अ अन्वये अपराध केल्याचे विनासंशय शाबीत केले नाही. सबब, आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे.

**२०.** त्याचप्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(१)(अ) प्रमाणे या न्यायनिर्णयाविरोधात अपिल दाखल झाल्यास त्यात हजर राहण्याची हमी म्हणून आरोपी याने सहा महिन्यांच्या कालावधीसाठी रक्कम रुपये १५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे असा आदेश देणे उचित ठरेल. अंतीमतः

मुद्दा क्र. च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी शिवशंकर पुंडलिक वाळके, रा. धोत्रा भनगोजी, ता. चिखली, जि. बुलडाणा यास फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८, ३०४–अ अन्वये शिक्षापात्र अपराधातून निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते. |
| ३. | प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल सी.डी. डिलक्स मो.सा. क्र. एमएच २८ बी.सी. ४९८३ या मुद्देमालाचा ताबा मुळ मालकाकडे कायम करणेत येत असून संबंधित सुपूर्तनाम्यातील अटी व शर्ती अपिल कालावधीनंतर शिथिल करणेत येत आहेत. |
| ४. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७(१)(अ) ची पुर्तता करणेकामी अपिल दाखल झालेस मा. अपिलीय न्यायालयात हजर राहणेकरीता सहा महिने मुदतीकरीता र.रु.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व जामिनपत्र दयावे. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.) |

Sd/-

**चिखली.** **(आय.ए.वाय.ए.खान)**

**दिनांक : ११/०८/२०२६** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,चिखली.**